महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, आरबी कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.
संपर्क क्रमांक (020)24478122 ईमेल : itdept@maa.ac.in

प्रति,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, योजना, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.

**विषय : शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी DIKSHA Portal वरील "AI Saathi for Educators" (शिक्षकांसाठी AI साथी) हा ऑनलाईन कोर्स पूर्ण करण्याबाबत.**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र द्वारे कोटक एज्युकेशन फाउंडेशन च्या सहकार्याने **"AI Saathi for Educators" (शिक्षकांसाठी AI साथी)** हा ऑनलाईन कोर्स विकसित करण्यात आला असून तो DIKSHA Portal वर उपलब्ध करून देण्यात आला आहे. . सदर ऑनलाईन कोर्सचे उद्घाटन मा. शालेय शिक्षण मंत्री, श्री. दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते दिनांक १४ जुलै २०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) हे तंत्रज्ञान आज शैक्षणिक तसेच प्रशासकीय व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनत आहे. AI चा योग्य, सुरक्षित व जबाबदार वापर केल्यास दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची गती, गुणवत्ता, अचूकता व कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होते. विविध प्रशासकीय कामे, अहवाल लेखन, माहितीचे विश्लेषण, सादरीकरणे तयार करणे, शैक्षणिक नियोजन, निर्णय प्रक्रिया तसेच कार्यालयीन कार्यक्षमता वाढविण्यासाठी AI आधारित साधनांचा प्रभावी वापर करता येतो.
सदर कोर्सद्वारे खालील बाबींची सविस्तर माहिती प्राप्त होते -

- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंग (Machine Learning) यांच्या मूलभूत संकल्पना., शिक्षण क्षेत्रामधील AI चे विविध उपयोग., AI आधारित उपयुक्त साधनांचा प्रभावी वापर., AI चा जबाबदार, सुरक्षित व नैतिक (Responsible AI) वापर., दैनंदिन कामकाजामध्ये AI चा प्रभावी समावेश करण्याच्या पद्धती.

या कोर्ससाठी दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ पर्यन्त प्रवेश घेता येणार असून कोर्स पूर्ण करण्याची अंतिम मुदत दिनांक ३० सप्टेंबर २०२६ आहे.

त्यामुळे आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विहित कालावधीत कोर्समध्ये प्रवेश घेऊन अंतिम मुदतीपूर्वी कोर्स पूर्ण करतील, याबाबत आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.

- **कोर्स सुरू करण्यापूर्वीची पूर्वतयारी**

**१. DIKSHA App डाउनलोड करणे: (स्मार्टफोन वरून कोर्स करण्यासाठी)**
Google Play Store वरून DIKSHA App डाउनलोड करून त्यामध्ये नोंदणी करावी व संपूर्ण प्रोफाईल भरावी.
प्रोफाईल भरताना आपल्या पदनामाशी तंतोतंत जुळणारे पदनाम उपलब्ध नसल्यास त्यास सर्वाधिक जवळचे पदनाम निवडावे. तसेच संबंधित पदनाम उपलब्ध नसल्याची माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निदर्शनास आणून द्यावी, जेणेकरून पुढील अद्ययावतीकरणामध्ये आवश्यक पदनामांचा समावेश करता येईल.
**२. DIKSHA Courses App डाउनलोड करणे:**

प्रोफाईल पूर्ण झाल्यानंतर Google Play Store वरून **DIKSHA Courses** हे App डाउनलोड करावे.
त्यानंतर खालील लिंकवर क्लिक करून कोर्समध्ये Enroll करावे.

**कोर्स लिंक :**

https://learning.diksha.gov.in/diksha/course.php?id=1252&section=2814&modeActive=8202

- **Browser द्वारे कोर्स पूर्ण करण्यासाठी (Laptop, Desktop वरून कोर्स पूर्ण करण्यासाठी.)**

Browser द्वारे कोर्स पूर्ण करू इच्छिणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी **www.diksha.gov.in** या संकेतस्थळावर Login अथवा नोंदणी करावी.

DIKSHA App मध्ये यापूर्वीच नोंदणी केलेली असल्यास त्याच ई-मेल आयडीद्वारे Login करता येईल. अशा वेळी पुन्हा प्रोफाईल भरण्याची आवश्यकता नाही. प्रथमच Login करत असल्यास आवश्यक ती प्रोफाईल माहिती पूर्ण भरावी.

Login केल्यानंतर मुख्य पृष्ठावरील "DIKSHA Courses" या Tab वर क्लिक करावे. त्यानंतर Search पर्यायामध्ये "AI Saathi for Educators" (शिक्षकांसाठी AI साथी) शोधून अथवा वरील लिंकचा वापर करून कोर्समध्ये प्रवेश (Enroll) घ्यावा. किंवा उपरोक्त दिलेली लिंक क्लिक करून कोर्समध्ये प्रवेश (Enroll) घ्यावा.

कोर्स यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर प्राप्त होणारे प्रमाणपत्र डाउनलोड करून घ्यावे.

सदर बाबीस प्राधान्य देऊन आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विहित कालावधीत सदर कोर्स पूर्ण करतील, याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

Digitally signed by
HEMANT VASEKAR
Date: 15-07-2026
18:20:59

**(डॉ. हेमंत वसेकर भा.प्र.से.)**
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव आणि कार्यवाहीस्तव :**

१. विभागीय उपसंचालक (सर्व)
२. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व)
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
४. प्रशासन अधिकारी म.न.पा. (सर्व)
५. शिक्षणाधिकारी (सर्व)